(Peer Reviewed Journal)

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच


संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

शब्दाली प्रकाशन पुणे-५८.

वर्ष : ९ वे अंक : तिसरा

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९


## डॉ. रंगनाथ पठारे साहित्य विशेषांक




वितरण क्षेत्र : दिल्ली, पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (बडोदा), तेलंगणा (हैदराबाद), बंगलोर, पुणे, नगर, नाशिक, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, गुहागर, यवतमाळ, कोल्हापूर, सातारा, सांगली, कराड, सोलापूर, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, अकोला, नांदेड, जळगाव, धुळे, नंदुरबार, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, भंडारा, वर्धा.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

■ एसडीएम/पुणे/एसआर/६१/६/४/२०१३ ■आयएसएसएन : २२३१-४३७७

शब्दाली प्रकाशन पुणे-५८.

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

■ वर्ष : ९ वे ■ अंक : तिसरा ■ ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

■ संपादक :
प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन
(एम.ए., एम.फिल., पीएच.डी. - मराठी)

■ प्रकाशक, मालक, मुद्रक :
सुनिता शैलेश त्रिभुवन (एम.ए. - मराठी)

■ पत्र व्यवहाराचा पत्ता : शब्दाली प्रकाशन
बी-५/२०६/दुसरा मजला, राहुलनिसर्ग, अतुलनगर, वारजे-माळवाडी, पुणे - ४११ ०५८.

■ मो. : ९९२२१ ३०१५७, ७८८८२ ६२३१०

■ Email : dr.shailesh.tribhuwan@gmail.com

■ टाईपसेटिंग : गणेश ग्राफिक्स, पुणे.

■ मुद्रक : गणेश ग्राफिक्स, पुणे. मो. ९०११७७३३२२

■ मुखपृष्ठ : संपादक

■ मुद्रित शोधन : प्रा. सुरेखा पंडित, मो.९९२२२६५७३३

■ वर्गणी : वार्षिक: व्यक्ती: रु.४००/- संस्था : रु.४५०

■ पाच वर्षे : व्यक्ती: रु.२,०००/- संस्था: रु.२,२५०

■ लेख : ७०८ श्रीलिपीमध्ये व ओपन फाईलमध्ये पाठवावेत.

■ वार्षिक व पंचवार्षिक वर्गणी :
आपल्या स्थानिक बँकेत - बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर, पुणे.
(IFCS Code - MAHB 00 00 970)
'शब्दाली प्रकाशन' पुणे. (खाते क्र. : 60058138435)
या खात्यावर जमा करून सदर पावती शब्दाली प्रकाशनाच्या पत्त्यावर पाठवावी.

■ सल्लागार मंडळ (Adviser Committee)

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले (पुणे) - मो. : ८८८०५७७०८८
डॉ. रावसाहेब कसबे (नासिक) - मो. : ९८५०५४७५७८
डॉ. यशवंत मनोहर (नागपूर) - मो. : ८००७१५५५७७
डॉ. निशिकांत मिरजकर (पुणे) - मो. : ९९७०१८४५६२
प्रा. दत्ता भगत (औरंगाबाद) - मो. : ९८८१२३००८४
प्रा. उत्तम कांबळे (नासिक) - मो. : ९८८१०९९१४३
प्रा. डॉ. मनोहर जाधव (पुणे) - मो. : ८७९६६४३८६४

■ परीक्षण समिती (Review Committee)

प्रा. डॉ. संजय करंदीकर (गुजरात) - मो. : ९९०९९१६९७८
प्रा. डॉ. अनिल सपकाळ (मुंबई) - मो. : ८३५५९३१०९२
प्रा. डॉ. सुधाकर शेलार (अ.नगर) - मो. : ९८९०९१३२३६
प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे (नागपूर) - मो. : ८१४९३१२१३४
प्रा. डॉ. प्रभाकर देसाई (पुणे) - मो. : ९८८१९०८०२०

■ संपादक मंडळ (Editor Committe)

प्रा. डॉ. सुनिल चंदनशिवे (कोल्हापूर) - मो. : ९८२२२०९४८९
प्रा. डॉ. सारिपुत्र तुपेरे (सोलापूर) - मो. : ९८२२९८४३१३
प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर (नांदेड) - मो. : ७५८८४१२१५३
प्रा. डॉ. तुषार चांदवडकर (नासिक) - मो. : ९४२२९४३६५२
प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे (रत्नागिरी) - मो. : ९९२१८४६१९८
प्रा. विनय मडगावकर (गोवा) - मो. : ८३०८४७७६६४
प्रा. डॉ. संजय कांबळे (कर्नाटक) - मो. : ९१६४३५८४८९
प्रा. डॉ. सुमेध रणवीर (प. बंगाल) - मो. : ७५८५९५०३६५
प्रा. डॉ. ताहिर पठाण (उ. प्रदेश) - मो. : ९९२२०२६६९८
प्रा. डॉ. अरुण कुलकर्णी (तेलंगणा) - मो. : ८१२१७४७५४४

■ *या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी सल्लागार मंडळ, संपादकीय मंडळ, संपादक, मालक मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

■ *या त्रैमासिकात लेख, शोधनिबंध, कविता छापण्यासाठी कोणतीही रक्कम स्वीकारली जात नाही. परंतु सभासदत्व अनिवार्य आहे.*

■ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

■ या अंकातील लेख करारबद्ध असून इतरत्र पूर्व परवानगी शिवाय छापता येणार नाहीत. (संपादक)



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601



# अं|त|रं|ग


* संपादकीय (मनोगत) — प्रा. डॉ. शैलेश त्रिभुवन (पुणे).............. ०२
२. आस्थेच्या प्रश्नांचा धांडोळा — प्रा. डॉ. अरुण ठोके (नाशिक)............ ०४
३. स्त्री–पुरूष प्रतिमाभंजनाचा कॅलिडोस्कोप: हारण — प्रा. डॉ. संजय नगरकर (पुणे)............... ०८
४. एका आरंभाचे प्रास्ताविक — प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर (अहमदनगर) ... ११
५. दु:खाचे श्वापद – रंगनाथ पठारे एक मानसशास्त्रीय आकलन — प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे (रत्नागिरी) ... २७
६. टोकदार सावलीचे वर्तमान : एक आकलन — प्रा. डॉ. वैशाली भालसिंग (अहमदनगर) ... ३०
७. मराठी कादंबरीच्या कक्षा विस्तारणारे चोषक फलोद्यान — प्रा. विजय चोरमारे (मुंबई) ............... ४१
८. 'समाज संस्कृती'तील फोलपणा मांडणारा कथा लेखक रंगनाथ पठारे — प्रा. डॉ. कैलास कळकटे (शहापूर) ....... ४३
९. 'दिवे गेलेले दिवस' समकालीन राजकीय घडामोडींचे व्यामिश्र चित्रण — प्रा. डॉ. सतीश कामत (सिंधुदुर्ग).......... ४६
१०. रंगनाथ पठारे यांच्या साहित्यातील तत्त्वविचार — प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत (पुणे) ........ ४८
११. उदाहरणार्थ नामुष्कीचे स्वगत : पठारी शैली — प्रा. डॉ. संजय बोरुडे (अहमदनगर) ....... ५४
१२. सातपाटील कुलवृत्तांत: स्त्रीत्त्वाची महती सांगणारी पुरुषार्थाची गाथा! — प्रा. प्रतिक पुरी (पुणे) ...................... ५९
१३. भर चौकातील अरण्यरूदन — प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर (अहमदनगर) ... ७४




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601



# समाज संस्कृती'तील फोलपणा मांडणारा कथा लेखक रंगनाथ पठारे



प्रा. कैलास कळकटे
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी ता. शहापूर जि. ठाणे.
दूरभाष : ९९२३९९२३९०

१९८० नंतरच्या कालखंडातील अत्यंत महत्त्वाचे कथाकार म्हणून रंगनाथ पठारे यांचा उल्लेख करावा लागतो. या कालखंडातील कथेचा चेहरा मोहरा बदलविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.या कालखंडात समाज जीवनात जे परिवर्तन झाले, त्याचे प्रतिबिंब ठळकपणे त्यांच्या कथासंग्रहात दिसून येते. ' अनुभव विकणे आहेत ' ( १९८४), ' स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग ' ( १९८२), 'ईश्वर मृतात्म्यास शांती देवो ! ' (१९९६), ' गाभ्यातील प्रकाश ' (१९९८),'चित्रमय चतकोर ' ( २०००), 'तीव्रकोमल दु : खाचे प्रकरण '( २००८ ) ,'शंखातला माणूस' ( २००८ ), हे पठारे यांचे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

रंगनाथ पठारे यांनी कथालेखनातून समाज संस्कृतीतील बहुकेंद्री वास्तव मांडतात.हे वास्तव मांडत असताना माणूस त्याच्या केंद्रस्थानी आहे .पण त्या बरोबरच माणसाला नियंत्रित करणाऱ्या राजसत्तेपासून ते धर्मसत्तेपर्यंतच्या याविषयी देखील ते मांडणी करतात. मानवाला संस्कृत करण्यासाठी जी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तिचे आजचे वास्तव रंगनाथ पठारे आपल्या कथालेखनातून मांडताना दिसतात . हे सगळे वास्तव त्यांनी उपाहासत्मक पध्दतीने मांडलेले आहे. यामुळेच त्यांच्या कथालेखनाची नाळ थेट चि.वि जोशी यांच्या पर्यंत जाते. आपल्या समग्र कथालेखनातून १९८० नंतरच्या बदलत्या जाणिवा त्यांनी मांडलेल्या आहेत. या कालखंडात भारताला स्वातंत्र्य मिळून २५ वर्ष पूर्ण झाले, देशावर आणीबाणी लादली गेली, औद्योगिकीकरण झपाट्याने होऊ लागले, विविध कारणांनी जातीय दंगली मोठ्या प्रमाणात झाल्या, १९९० नंतर ' खाउजा' धोरण स्विकारले गेले, अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाली या सगळ्या घटनांचा परिणाम मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात झाला. माणूस माणुसकी ऐवजी पैशाभोवती केंद्रीत झाला. माणसाच्या जगण्याला यंत्राचे स्वरूप प्राप्त झाले. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर पठारे यांच्या कथालेखनातून येते. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर त्यांच्या कथालेखनात येत नाही तर या जाणिवा अशा का? झाल्या याचा शोध ही निवेदकाच्या माध्यमातून ते घेण्याचा प्रयत्न करतात. तर कधी कधी प्रश्न उपस्थित करून त्या माध्यमातून या वास्तवाची उकल करताना ते दिसतात.

फक्त समाज संस्कृती चे वास्तवच ते मांडत नाही तर मानवी नातेसंबंधाचा शोध ही ते घेताना दिसतात. हा शोध घेताना ते त्याच्या तळाशी जातात. हा शोध घेत असताना अतिशय सरळ पध्दतीने अनुभव कथन करतात. सरळ असणाऱ्या या अनुभवात कुठेतरी उपरोधिक पध्दतीचे एखादे वाक्य ते वापरतात त्यामुळे मुळात अतिशय सरळ असलेला हा आशय नंतर तिरकसपणे आपल्यासमोर येतो. याचे कारणही त्यांच्या लेखन विषयक भूमिकेत सापडते कारण ते म्हणतात, माझ्या जगण्याचे वर्तमान हा मला माझ्या कुतूहलाचा कणा वाटत आलेला आहे. भूत आणि भविष्याचा जेव्हा जेव्हा मी विचार केला असेन तोही वर्तमान समजावून घेण्यासाठीच. जगण्यातल्या गुंतागुंतीचा वेध घेताना पुष्कळ ठेचा बसतात. पुष्कळ धडपडावे लागते, पुष्कळ भ्रमनिरास होतात. ते सारे लेखनात येते. आपल्या भोवतालची विराट रानटी व्यवस्था आपल्याला समजा खूप तापदायक होत असते व

" १९९० नंतर ' खाउजा' धोरण स्विकारले गेले, अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाली या सगळ्या घटनांचा परिणाम मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात झाला. माणूस माणुसकी ऐवजी पैशाभोवती केंद्रीत झाला. माणसाच्या जगण्याला यंत्राचे स्वरूप प्राप्त झाले. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर पठारे यांच्या कथालेखनातून येते. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर त्यांच्या कथालेखनात येत नाही तर या जाणिवा अशा का? झाल्या याचा शोध ही निवेदकाच्या माध्यमातून ते घेण्याचा प्रयत्न करतात. तर कधी कधी प्रश्न उपस्थित करून त्या माध्यमातून या वास्तवाची उकल करताना ते दिसतात. "



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

ती बदलण्यासाठी वा तिच्यावर घाव घालण्यासाठी सरळपणे आपण काही करू शकत नाही तेव्हा एक प्रकारच्या आत्मनिंदेचा व आत्मटीकेचा स्वर लावत आपण तिरके होतो. आपली सारी प्रतिक्रियाच तिरकस होते. यामुळेच रंगनाथ पठारे यांचे एकूण लेखनच तिरकसपणातील सरळता ठरते.

सगळ्या व्यवस्थेसमोर माणूस कसा हातबल झाला आहे याचे चित्रण त्यांच्या कथालेखनातून येते. या व्यवस्थेचा बळी माणूस कसा ठरत आहे याचे चित्रण ते कथेच्या माध्यमातून करतात. शासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार किती खालच्या पातळीला गेला आहे. याची मांडणी 'कॉ. गोपीनाथ यांच्य विषयी एक आठवण' या कथेतून त्यांनी केली आहे.तीन 'म' भोवती फिरणारी सरकारी यंत्रणेची मानसिकता व त्याच्या समोर हतबल झालेला माणूस 'देवराम खाडे' या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून ते उभा करतात.मग ही कथा फक्त देवराम खाडे व त्याच्या पत्नीची न राहता, समस्त शेतकरी वर्गाची होते. पहार हाताने वाकविणारा हा माणूस या यंत्रणेसमोर कसा हातबल झाला आहे, गरजेपोटी आपल्या बायकोला दुसऱ्याच्या स्वाधीन कसे करावे लागते व त्याच्या गरजेचा किंवा दबलेपणाचा ही सरकारी यंत्रणा कसा फायदा घेते याचे चित्रण ते करतात.कथाकाराच्या भूमिकेतून ही कथा इथेच संपते पण पठारे यांना या व्यवस्थेतील फोलपणा अधोरेखित करावयाचा आहे. म्हणून सरकारी यंत्रणेतील ज्या लोकांना या तीन 'म' जुळवून घेता आले नाही त्यांचे जीवन व जे या तीन 'म' शी जुळवून घेऊन जीवन जगले त्यांचे जीवनही ते निवेदकाच्या माध्यमातून मांडतात.

गोपीनाथ एकटा आला आणि एकटा गेला चार माणसं त्याचं नाव घेतील आणि त्याला विसरून जातील. बाकी काय?

पण शंकरने या सगळ्या परिस्थितीशी जुळवून घेतले मी मात्र पुर्ण सुरक्षित आहे. माझं सगळं ठीक झालंय पैसा आहे. घर झालंय मुलं रांगेला लागलीयेत अखेरीस आयुष्यात काय पाहिजे ?

यासारखे निवेदकाचे भाष्य त्यांच्या कथालेखनात जागोजागी सापडते. रंगनाथ पठारे यांच्या निवेदकाविषयी प्रभाकर बागले यांनी नोंदविलेले निरीक्षण अतिशय महत्त्वाचे आहे ते म्हणतात, या निवेदकाची प्रकृती समाजाभिमुख आहे. अंतर्मुख होण्याच्या प्रचंड क्षमता असूनही त्याला आधी बहिर्मुख व्हावेसे वाटते. आणि हे स्वाभाविक आहे.कारण बहिर्मुख होऊन तो जी निरिक्षणे नोंदवतो, ती त्याच्या अंतर्मुख होण्याला आशय पुरवित असतात. नुसते अंतर्मुख होणे म्हणजे स्वतःलाच कोरणे असते.हा निवेदक वास्तवाला कोरतो आणि अंतर्मुख होऊन भाष्य करताना दिसतो. तो सुशिक्षित सुसंस्कृत व प्रगल्भ असल्यामुळे त्याची संवेदनशीलता अतिशय तरल आहे या प्रमाणेच 'जनसेवक मंडळी', 'सटाणा ते सटाणा' यासारख्या काही कथांमधून त्यांनी शिक्षण क्षेत्रातील राजकारण, संस्था संचालकाचा स्वतःच्या स्वार्थासाठी या संस्थाचा कसा वापर केल्या जातो, शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून आपले नातेवाईक व कार्यकर्त्यांचे हितसंबंधाची जोपासना कशाप्रकारे केली जाते याचे चित्रण ते करतात.

रंगनाथ पठारे यांच्या सम्रग कथालेखनावर एक दृष्टीक्षेप टाकला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे समाज संस्कृतीतील प्रत्येक घटकावर ते प्रकाश टाकतात. माणसाच्या जगण्याला आलेले शुद्रपण ते त्यातून अधोरेखित करतात. ही सगळी व्यवस्था शेवटी पैशाच्या भोवती कशी केंद्रीत होते याचे चित्रणही ते करतात. पैसाजवळ आल्यानंतर सामान्य माणूसही कसा बिघडतो याचे चित्रण त्यांनी ' काही खरं नाही' या कथेतून केले आहे. जातीयता वाढविण्यासाठी श्रीमंत लोक कसे जबाबदार आहेत याचे चित्रण 'मजहबची वस्ती ' मध्ये येते.

रंगनाथ पठारे हे ज्यापध्दतीने समाज संस्कृती मधील फोलपणा मांडतात त्याचप्रमाणे मानवी जीवनात झालेले बदल व आजच्या मानवी जीवनाचे चित्रण ही ते करतात व हे करीत असताना पात्राच्या संवादातून तर कधी निवेदनातून येते . उदा एकतर हल्लीच्या काळात प्रेम वगैरे या अगदी हास्यास्पद गोष्टी झालेल्या आहेत. कोणासाठी जीव टाकणं वा कुढणं असलं काही करायला हल्ली वेळ कोणाला? आणि गरजच नाही त्याची? प्रेम कशासाठी करायचं? त्याचा अंतिम हेतू काय? तर बाई बरोबर झोपणं त्याच्यासाठी हल्ली इतक्या



Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

कटकटी करण्याची गरज भासत नाही. माझ्यासारख्या अनेकांचा अनुभव आहे हा किंवा किती सरळसोट जमाना आहे, त्याचा सरळ फायदा घ्या ना! जुन्या कादंबऱ्या खांडेकर वगैरे यांचं हळवं ध्येयवादी प्रेम झुरणं हे आता इतिहासात गेलंय .त्याची गरज संपली प्रेमासंबंधी ज्या पध्दतीने चित्र लेखकाने उभे केले त्याचपध्दतीने लालसा, स्वार्थी, नवरा बायको यांच्यातील संबंध प्रियकर - प्रेयसी यांचे संबंध याचे वास्तवही ते मांडतात. 'शरद पवार एक खानदानी भिंत' व 'काही खरं नाही' या दोन कथांमधून त्यांनी मराठा समाजातील खानदानीपणातील फोलपणा मांडतात. मानवी जीवनाची सर्वांगीण चिकित्सा करताना पठारे यांची कथा, कथनाचे सगळे सामर्थ्य जोखते, कथन गुणांच्या बाबतीत चिरनूतन ठरते, आपल्या काळावर व हासावर उपरोध-उपहासाचे शस्त्र उगारते, संवेदनक्षम बनवते.

कथालेखनाच्या माध्यमातून ज्यापध्दतीने 'समाज संस्कृती' तील फोलपणा त्यांनी मांडला त्याचप्रमाणे कथालेखनाचे विविध प्रयोग करून त्यांनी आपले 'प्रयोगशीलतत्व' ही त्यांनी सिध्द केले. ज्या पध्दतीने त्यांनी कथालेखनासाठी विविध विषय हाताळले त्याच पध्दतीने विविध प्रयोग ही कथा लेखनात केले. ना. सी. फडके यांनी सांगितलेल्या लघुकथालेखनाच्या उलट कथा त्यांनी लिहिली. तोच प्रयोग त्यांनी' ईश्वर मृतात्म्यास शांती देवो' याकथेत ना. सी. फडके यांनी सांगितलेल्या मंत्राच्या विरोधात ही कथा त्यांनी लिहिली. 'प्रारंभ' 'मध्य' आणि 'शेवट' या शीर्षकाखालीच त्यांनी कथा लिहिली तसेच' चोखोबाच्या पाठी' या कथेमध्ये कथालेखनात चोखोबाचे अभंग घेऊन चोखोबा सोबत घेऊन पंढरपूर मध्ये चोखोबाचा फोटो घेण्यासाठी जातात व तिथे आजच्या पंढरपूरचे वास्तवदर्शी चित्र उभे करतात तसेच पददलित समाजाचे आजचे चित्र व तत्कालीन समाजाचे चित्र मांडतात हे सगळे करीत असताना चोखोबाचे अभंगमध्ये पेरतात.

ज्यापध्दतीने लेखनात विविध प्रयोग करतात त्याचप्रमाणे निवेदन पध्दतीचे विविध प्रयोग ते करतात. उदा. 'मोडलेल्या नायकाची स्वप्ने' या कथेतील निवेदक 'पूर्वी एकदा' अशी सुरूवात करून बालपणीच्या घटना सांगतो तर 'परवा एकदा' अशी सुरूवात करून वर्तमान सांगतो पूर्वी एकदा नंतर परवा एकदा नंतर पुन्हा पूर्वी एकदा पुन्हा परवा एकदा अशा पध्दतीने कथा पुढे जाते.

प्रयोगशीलतेच्या दृष्टीने 'स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग' 'तीव्र कोमल दु:खाचे प्रकरण हे दोन कथासंग्रह पाहण्यासारखे आहेत.

वरील सर्व गुण वैशिष्ट्यांमुळेच रंगनाथ पठारे यांनी मराठी कथेत आपले स्वत: चे स्थान निश्चित केले आहे.

संदर्भ सूची : १. पठारे रंगनाथ ,सत्त्वाची भाषा,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, आवृत्ती दुसरी, २०१४ ,पृ.क्र १६४. २.बागले प्रभाकर, साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर ,पहिली आवृत्ती,२०१४,पृ.क्र २६६ ३.पगार एकनाथ ,संपा.कोंभालगतचा प्रवास ,लोकवाङ्मय गृह, पहिली आवृत्ती , सप्टें २००९ , प्रस्तावना पृ.क्र ५३

शब्दाली प्रकाशन पुणे अंतर्गत प्रकाशित होणारे सक्षम समीक्षा त्रैमासिक

**अशी पाठवा वर्गणी**

मनी ऑर्डर / धनादेश / धनाकर्ष संपादक 'शब्दाली प्रकाशन' या नावाने किंवा मेल ट्रान्सफरने जमा करावयाची असल्याची 'बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर, पुणे' या शाखेत जमा करावी.
खाते संपादक : शब्दाली प्रकाशन, खाते क्र. : 60058138435/IFCS Code - MAHB 0000970

वार्षिक वर्गणी : ४००/- (व्यक्ती), ४५०/- (संस्था),
पंचवार्षिक : २०००/- (व्यक्ती), २२५०/- (संस्था)



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane. 421 601